महाराष्ट्र शासन
अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत क्र.२
४ था माळा, ए-विंग, जिल्हा परिषद जवळ, सिव्हिल लाईन, नागपूर
दुरध्वनी क्र. ०७१२-२९८०२७३/७५ ई-मेल :- adclngp@gmail.com

क्र.अकाआ/मदुवआ/काठिमलैंछ/अं.त.समीती/ 5781 / २०२४ दिंनाक 26 SEP 2024

प्रति,

सर्व दूकाने व आस्थापना,

जिल्हा नागपूर

**विषय:-** **कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम ०९.१२.२०१३ अन्वये अंतर्गत तक्रार समिती गठित करण्याबाबत.**

**संदर्भ:-** **१ केंद्र शासनाच्या कामाचा ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम ०९.१२.२०१३.**

**२ महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय: मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दि. १९.०६.२०१४.**

**३ मा. अतिरीक्त जिल्हाधिकारी तथा जिल्हा अधिकारी (का.ठि.म.लै.छ.अ) यांनी दिनांक २०/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम दि. ०९.१२.२०१३ अन्वये महिलांची कामाच्या ठिकाणावर होणारी लैंगिकछळवणूक विरोधी संरक्षणसाठी प्रत्येक शासकीय / निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था ज्यांची शासनाने स्थापना केली असेल. स्थानिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सहकारी संस्था अशा सर्व आस्थापना. तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र संघटना किंवा खाजगी उपक्रम/संस्था, इंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्या, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्य, इ. सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रुषालये, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रिडासंकुले इ. ठिकाणी किंवा अधिनियमात नमुद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कामाचे/कार्यालयाचे ठिकाण **ज्यामध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी/कामगार/व्यक्ती यांचा समावेश असेल अशा प्रत्येक नियोक्त्याने आपल्या आस्थापनामध्ये खालील प्रमाणे अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे अनिवार्य आहे**. तरी सदरहु समिती मध्ये खालील प्रमाणे सदस्यांचा समावेश असावा.

...२

अ. कार्यालयातील वरिष्ठा महिला अधिकारी, यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करावी. परंतु, वरिष्ठ महिला अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसेल तर इतर कार्यालय, प्रशासकीस विभाग जी विविध ठिकाणी म्हणजे विभाग किंवा उपविभाग स्तरावर कार्यरत आहेत अशा कार्यालयातील उच्च पदस्थ महिला अधिकारी यांची अध्यक्ष म्हणुन नियुक्ती करता येईल.

तसेच कामाच्या ठिकाणी असणाऱ्या इतरकार्यालयात किंवा प्रशासकीय विभागात सुध्दा वरिष्ठ स्तरावरील महिला अधिकारी/कर्मचारी उपलब्ध होत नसेल तर त्याच नियोक्त्याच्या अन्य कोणत्याही कामाच्या ठिकाणाहुन किंवा इतर विभागातुन किंवा खाजगीक्षेत्रात इतरसंघटनेतील अध्यक्ष पदस्थ महिला अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल.

ब. सदर समितीमध्ये, प्राधान्याने महिलांच्या सोयीसाठी बांधिल असलेल्या किंवा ज्यांना सामाजिक कार्याचा अनुभव आहे किंवा ज्यांना कायद्याचे ज्ञान आहे अशा कर्मचाऱ्यांमधुन किमान दोन सदस्य नियुक्त करावेत.

क. महिलांच्या प्रश्नांशी बांधिल असलेंल्या अशासकीय संघटना किंवा संघ किंवा लैगिंक छळाशी संबंधित प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्ती. यामधील एक सदस्य असावा.

परंतु, अशा रीतीने नामनिर्देशित करावयाच्या एकुण सदस्या पैकी किमान ५०% सदस्य महीला असाव्यात.

अंतर्गत तक्रार समितीचे अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य यांची कार्यालय प्रमुखाकडुन नियुक्तीकरण्यात येईल व त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासूनतीन वर्षाहुन अधिक नसेल इतक्या कालावधी- साठी पद धारण करतील.

तरी उक्त अधिनियमांच्या कलम २६ मधील तरतुदीनुसार जर एखाद्या मालकाने कलम (अ) अंतर्गत तक्रार समिती स्थापन केले नाही ( ब ) अधिनियमातील कलम १३,१४,२२ नुसार कारवाई केली नाही (क) या कायद्यातील व नियमातील विविध तरतुदीचे व जाबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास लायसन्स रद्द, दुप्पट दंड अशी तरतुद आहे.

**तरी आपणांस निर्देशित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त कार्यालय/कंपनी/दुकाने व आस्थापना तसेच आस्थापने अंतर्गत येणाऱ्या सर्व कामाच्या ठिकाणामधील अंतर्गत तक्रार समितीचा आदेश व समिती गठित केली नसल्यास अंतर्गत तक्रार समिती गठित करुन तसा समिती गठित केल्याचा अहवाल** सोबत जोडलेल्या नमुना प्रपत्रात कार्यालयीन ईमेल-_adclngp@gmail.com यावर पत्र मिळाल्यापासुन तीन (३) दिवसाच्या आत न चुकता तात्काळ सादर करावा.

मंपौनिकर

(मं. म. पौनिकर)
दुकाने निरीक्षक/ सुविधाकार
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, नागपूर.

# आस्थापनेतील महिला दक्षता समिती

१) आस्थापनेचे नाव व पत्ता : -------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------

२) मालकाचे नाव : -------------------------------------------------------------------------------------------

३) नोंदणी क्रमांक : -------------------------------------------------------------------------------------------

४) एकुण कर्मचारी संख्या : -------------------------------------------------------------------------------------------

५) महिला कर्मचा-यांची संख्या : -------------------------------------------------------------------------------------------

६) समिती गठीत केल्याची तारीख : -------------------------------------------------------------------------------------------

७) समितीतील सदस्यांची नावे : -------------------------------------------------------------------------------------------

अध्यक्ष : १) -------------------------------------------------------------------------------------------

सचिव : २) -------------------------------------------------------------------------------------------

सदस्य :३) -------------------------------------------------------------------------------------------

सदस्य :४) -------------------------------------------------------------------------------------------

सदस्य :५) -------------------------------------------------------------------------------------------

८) समितीच्या किती बैठका झाल्या : -------------------------------------------------------------------------------------------

९) कहिलांच्या लैंगिक छळाबाबत काहि : -------------------------------------------------------------------------------------------

तक्रारी प्राप्त झाल्या किंवा काय ?

१०) आस्थापनेचा ईमेल आणि दुरध्वनिक्रमांक : -------------------------------------------------------------------------------------------

दिनांक :
स्थळ :

आस्थापना मालकाचे/व्यवस्थापकाचे
नाव व स्वाक्षरी